शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2026



# आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला तीन कांस्यपदके

कोल्हापूर : भोपाळ (मध्य प्रदेश) येथील संजीव अग्रवाल विद्यापीठात सुरू असलेल्या साऊथ-वेस्ट विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तीन कांस्यपदके पटकाविली. स्पर्धेत सहभागी झालेल्या एकूण पाचही खेळाडूंची निवड चंदीगड (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी झाली.

निकिता कमलाकर (५८ किलो), राजनंदिनी आमने (६९ किलो), ईश्वरी पवार (७७ किलो), तनुजा पोळ (६३ किलो, चतुर्थ क्रमांक), श्रावणी जाधव (५८ किलो, पाचवा क्रमांक) यांनी यश मिळवले.

या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून देवचंद महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र चव्हाण, प्रशिक्षक म्हणून श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

1 4 JAN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# उभयचरांच्या संवर्धनासाठी शस्त्रक्रियाविरहित अंतःस्रावी शास्त्र परिणामकारक : ग्रामपुरोहित

## डॉ. आप्पासाहेब वरुटे स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन या दृष्टीने उभयचरांवरील शस्त्रक्रियाविरहित अंतःस्रावी शास्त्र अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरणारे आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागातर्फे आयोजित डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. यावेळी डॉ. प्रतापसिंह वरुटे आणि विभागप्रमुख डॉ. एस.आर. यन्कंची उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे व्याख्यानमालेत डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. माधव भिलावे, डॉ. प्रतापसिंह वरुटे आणि डॉ. एस.आर. यन्कंची उपस्थित होते.

"उभयचरांच्या संवर्धन शरीरक्रियेत शस्त्रक्रियाविरहित अंतःस्रावी शास्त्राचे महत्त्व" या विषयावर ते बोलत होते. ते म्हणाले, बेडूक, साप, सरडे यासारखे उभयचर व सरीसृप प्राणी आज पर्यावरणीय बदल, प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. समन्वयक डॉ. माधव भिलावे यांनी प्रास्ताविक केले. साईंजली पाटील आणि वेदिका गुरव यांनी सूत्रसंचालन केले.

14 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज


वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# उभयचरांच्या संवर्धनासाठी शस्त्रक्रियाविरहित अंत:स्त्रावी शास्त्र परिणामकारक : डॉ. नरहरी ग्रामपुरोहित

**कोल्हापूर, ( महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज) :**

जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन या दृष्टीने उभयचरांच्या शस्त्रक्रियाविरहित अंतः स्त्रावी शास्त्राचे उपयोजन अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरणारे आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी काल (दि. १२) येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. कार्यक्रमास डॉ. प्रतापसिंह वरुटे प्रमुख उपस्थित होते.



''उभयचरांच्या संवर्धन शारीरक्रियेत शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्राचे महत्त्व'' या विषयावर बोलताना डॉ. ग्रामपुरोहित म्हणाले, बेडूक, साप, सरडे यांसारखे उभयचर व सरीसृप प्राणी आज पर्यावरणीय बदल, प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या प्राण्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक विज्ञानात शस्त्रक्रियाविरहित अंतः स्त्रावी शास्त्र (Non-invasive Endocrinology) ही एक महत्त्वाची आणि उपयुक्त पद्धत ठरत आहे. या पद्धतीत प्राण्यांना इजा न करता त्यांच्या लघवी, विष्ठा, त्वचा स्राव किंवा केसांमधील संप्रेरकांचे (हार्मोन्सचे) परीक्षण केले जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याची स्थिती, तणावाची पातळी, प्रजननक्षमता आणि पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता समजते.

डॉ. ग्रामपुरोहित पुढे म्हणाले, पूर्वी प्राण्यांवर शस्त्रक्रिया करून किंवा रक्तनमुने घेऊन अभ्यास केला जात असे. मात्र या प्रक्रियेमुळे प्राण्यांना तणाव येत असे. शस्त्रक्रियाविरहित पद्धतीमुळे प्राणी सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक वर्तनात अडथळा येत नाही. या संशोधनामुळे संकटग्रस्त प्रजातींच्या प्रजनन कार्यक्रमांना चालना मिळते, त्यांचे आरोग्य वेळेवर तपासता येते आणि संवर्धनाच्या योजना अधिक परिणामकारकपणे राबवता येतात. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी ही पद्धत भविष्यात अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. प्रतापसिंह वरुटे यांनी माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरुटे यांच्या जीवनकार्याविषयी उपस्थितांना अवगत केले. व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. माधव भिलावे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. साईंजली पाटील व वेदिका गुरव यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. एस.आर. यन्कंची यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# उभयचर संवर्धनासाठी अंतःस्त्रावी शास्त्र परिणामकारक

**जनप्रवास : कोल्हापूर**

विविधतेचे संरक्षण आणि संवर्धन या दृष्टीने उभयचरांच्या शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्राचे उपयोजन अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरणारे आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. डॉ. प्रतापसिंह वरुटे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. ग्रामपुरोहित म्हणाले, बेडूक, साप, सरडे यासारखे उभयचर व सरीसृप प्राणी आज पर्यावरणीय बदल, प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या प्राण्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक विज्ञानात शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्र ही एक महत्त्वाची आणि उपयुक्त पद्धत ठरत आहे. या पद्धतीत प्राण्यांना इजा न करता त्यांच्या लघवी, विष्ठा, त्वचा स्राव किंवा केसांमधील संप्रेरकांचे (हार्मोन्सचे) परीक्षण केले जाते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याची स्थिती, तणावाची पातळी, प्रजननक्षमता आणि पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता समजते. पूर्वी प्राण्यांवर शस्त्रक्रिया करून किंवा रक्तनमुने घेऊन अभ्यास केला जात असे. मात्र या प्रक्रियेमुळे प्राण्यांना तणाव येत असे. शस्त्रक्रियाविरहित पद्धतीमुळे प्राणी सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक वर्तनात अडथळा येत नाही. या संशोधनामुळे संकटग्रस्त प्रजातींच्या प्रजनन कार्यक्रमांना चालना मिळते. यावेळी डॉ. प्रतापसिंह वरुटे यांनी माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरुटे यांच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली. डॉ. माधव भिलावे यांनी प्रास्ताविक केले. साईंजली पाटील व वेदिका गुरव यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. एस. आर. यन्कंची यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**शिवाजी विद्यापीठात व्याख्यानमालेत बोलताना डॉ. नरहरी ग्रामपुरोहित. सोबत डॉ. माधव भिलावे, डॉ. प्रतापसिंह वरुटे, डॉ. एस. आर. यन्कंची.**

## ● डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांचे प्रतिपादन

जनसंपर्क कक्ष

14 JAN 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैवविविधतेच्या संवर्धनासाठी अंत:स्त्रावी शास्त्र प्रभावी

प्रतिनिधी
कोल्हापूर

जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन या दृष्टीने उभयचरांच्या शस्त्रक्रियाविरहित अंत:स्त्रावी शास्त्राचे उपयोजन अत्यंत प्रभावी व परिणामकारक ठरणारे आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी केले.

■ डॉ. नरहरी ग्रामपुरोहित

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. प्रतापसिंह वरुटे प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. ग्रामपुरोहित म्हणाले, बेडूक, साप, सरडे यांसारखे उभयचर व सरीसृप प्राणी आज पर्यावरणीय बदल, प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. प्राण्यांच्या संवर्धनासाठी शस्त्रक्रियाविरहित अंत:स्त्रावी शास्त्र ही एक महत्त्वाची पद्धत ठरत आहे. या पद्धतीत प्राण्यांना इजा न करता त्यांच्या लघवी, विष्ठा, त्वचा स्राव किंवा केसांमधील संप्रेरकांच्या परीक्षणाने आरोग्याची स्थिती, तणावाची पातळी, प्रजननक्षमता आणि पर्यावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता समजते.

14 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ४९२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ४९२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, अधिविभागात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. मंगळवारी एमबीए., बीए, बीएड, बीएस्सी, एमबीए (डिस्टन्स), बीबीए, एमबीए (एकात्मिक) आदी ११ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ५४ केंद्रांवर सुरळीतपणे पार झाल्या. परीक्षेला ३ हजार ९१४ विद्यार्थी उपस्थित होते. दि.१३ रोजी पीजी डिप्लोमा इन सेफ्टी मॅनेजमेंट, एमए (समाजशास्त्र), एमए (मराठी), एमबीए (रुरल मॅनेजमेंट) आदी १९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

14 JAN 2026
तरूण भारत

# ३९०० विद्यार्थ्यांनी दिली पदवी, पदव्युत्तरची परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या विविध अभ्यासक्रमांसाठी ३९१४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विविध ११ अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवारी वर्णनात्मक पध्दतीने ५४ परीक्षा केंद्रावर पार पडल्या. परीक्षेतील १९ अभ्यासक्रमांचे निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आले. आजअखेर ४९२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

14 JAN 2026
लोकमत



प. विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत तृतीय आलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाची ऑल इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. यावेळी प्रशिक्षक अरिफ सिद्दिकी, खेळाडू.

# आंतर विद्यापीठ टेनिससाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने तिसरा क्रमांक पटकाविला. या संघाची जयपूर येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.

मेरीवेदर शेजारील केडीएलटीएच्या मैदानावर ७ जानेवारीपासून या स्पर्धा झाल्या. त्यात ४६ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठ संघात अश्विन नरसिंघानी, प्रथमेश पाटील, ओंकार शिंदे, अंकित बठेजा आणि पृथ्वी या खेळाडूंचा समावेश होता. त्यांना केडीएलटीएचे मुख्य प्रशिक्षक अरिफ सिद्दिकी, प्रशिक्षक संजय साळुंखे, सागर फडतारे, संजय पास्वान, यशवंत कोळी, उत्तम फराकटे यांचे मार्गदर्शन लाभले.

14 JAN 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्राचे उपयोजन प्रभावी

## डॉ. नरहरी ग्रामपुरोहित : विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब वरुटे स्मृती व्याख्यानमाला



शिवाजी विद्यापीठ : डॉ. आप्पासाहेब वरुटे व्याख्यानमालेत बोलताना डॉ. नरहरी ग्रामपुरोहित. यावेळी उपस्थित डॉ. माधव भिलावे, प्रतापसिंह वरुटे, एस.आर. यंन्कची.

कोल्हापूर, ता. १३ : 'जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन यादृष्टीने उभयचरांच्या शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रवी शास्त्राचे उपयोजन अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक ठरणारे आहे', असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्या डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेमध्ये 'उभयचरांच्या संवर्धन शारीरक्रियेत शस्त्रक्रियाविरहित अंतःस्त्रावी शास्त्राचे महत्त्व' या विषयावर ते बोलत होते. डॉ. ग्रामपुरोहित म्हणाले, 'पूर्वी प्राण्यांवर शस्त्रक्रिया करून किंवा रक्ताचे नमुने घेऊन अभ्यास केला जात असे. मात्र, या प्रक्रियेमुळे प्राण्यांना तणाव येत असे. शस्त्रक्रियाविरहित पद्धतीमुळे प्राणी सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक वर्तनात अडथळा येत नाही. या संशोधनामुळे संकटग्रस्त प्रजातींच्या प्रजनन कार्यक्रमांना चालना मिळते, त्यांचे आरोग्य वेळेवर तपासता येते आणि संवर्धनाच्या योजना अधिक परि णामकारकपणे राबवता येतात. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी ही पद्धत भविष्यात अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.' यावेळी डॉ. प्रतापसिंह वरुटे यांनी माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरुटे यांच्या जीवनकार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. एस. आर. यन्कंची, व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. माधव भिलावे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2026 लोकमत

# हिंदीची ज्ञानभाषेकडे झालेली वाटचाल महत्त्वपूर्ण

## डॉ. ज्योती जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : देशामध्ये सामाजिक, सांस्कृतिक एकोपा जोपासण्याबरोबरच हिंदी भाषेने ज्ञानभाषा म्हणून चालविलेली वाटचाल महत्त्वपूर्ण स्वरूपाची आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा हिंदी आणि क्रीडा अधिविभाग तसेच राजभाषा विभागातर्फे विश्व हिंदी दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यानिमित्ताने जी. डी. बिर्ला स्मृती व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते हिंद केसरी दीनानाथ सिंह यांनी राजर्षी शाहू महाराजांनी निर्माण केलेली कोल्हापूरची कुस्ती परंपरा आणि आपला हिंदकेसरी बनण्यापर्यंतचा प्रवास सांगितला. अमरदीप कुलश्रेष्ठ यांनी राजभाषा, राष्ट्रभाषा व संपर्क भाषा यांतील फरक स्पष्ट करताना हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसाराचे महत्त्व अधोरेखित केले.

हिंदी विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश निकम यांनी परिचय करून दिला. अविनाश कांबळे आणि शीतल चौगले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अक्षय भोसले यांनी आभार मानले. यावेळी क्रांतीकुमार देवरे, क्रीडा अधिविभागाचे डॉ. एन. डी. पाटील, समन्वयक डॉ. जयसिंग कांबळे, अनमोल कोठाडिया, डॉ. संतोष कोळेकर, डॉ, सुवर्णा गावडे, प्रा. प्रतीक्षा ठुबरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 JAN 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# आंतरराष्ट्रीय 'ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६' मध्ये शिवाजी विद्यापीठाचे १६८ संशोधक

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचा समावेश; माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अग्रस्थानी

**कोल्हापूर, ( महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

कोल्हापूर, दि. १३ जानेवारी: जागतिक पातळीवरील संशोधन कार्याचे मूल्यमापन करणाऱ्या ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १६८ संशोधकांचा समावेश झाला आहे. यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश असून डॉ. पाटील विद्यापीठातील संशोधकांत अग्रस्थानी आहेत.

ए.डी. सायंटिफिक इंडेक्स हा जगभरातील संशोधक व विद्यापीठांचे स्थानांकन करणारा आंतरराष्ट्रीय निर्देशांक असून, संशोधकांच्या एच-निर्देशांक (h-Index),, आय-टेन निर्देशांक (i10-Index) आणि शोधनिबंधांवरील उद्धरणे (Citations) या निकषांवर आधारित ही क्रमवारी निश्चित केली जाते. या निर्देशांकांमुळे संशोधनाचा दर्जा, सातत्य आणि जागतिक प्रभाव अधोरेखित होतो.

या निर्देशांकात शिवाजी विद्यापीठातील विविध शास्त्र शाखांतील संशोधकांचा समावेश असून, विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या क्षेत्रांतील संशोधनाचा समावेश आहे.

विद्यापीठातील आघाडीचे दहा संशोधक (h-Index आधारित) अनुक्रमे असे: डॉ. प्रमोद पाटील (भौतिकशास्त्र), डॉ. एस. पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव




राजपुरे (सौरघट), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (ऊर्जा अभियांत्रिकी), डॉ. चंद्रकांत भोसले (भौतिकशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैववैद्यकीय अभियांत्रिकी), डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. संजय कोळेकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डी. डोंगळे (विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र).

याखेरीज सदर यादीत पुढे डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. विजया पुरी, डॉ. जॉन डिसूझा, डॉ. डी.एम. पोरे, डॉ. एस.आर. सावंत, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्यासह १६८ संशोधकांचा समावेश आहे. या यशामुळे शिवाजी विद्यापीठाची जागतिक संशोधन ओळख अधिक भक्कम झाली असून, विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि संशोधन निधी मिळविण्यासाठीही ही बाब उपयुक्त ठरणार आहे.

'संशोधकांच्या यशाची वाढती कमान अभिमानास्पद'

शिवाजी विद्यापीठाचे संशोधक सातत्याने ए.डी. सायंटिफिक क्रमवारीत झळकत आहेत. शिवाय या यादीमधील त्यांची संख्या वर्षागणिक वाढते आहे. विद्यापीठातील संशोधकांच्या यशाची ही वाढती कमान अभिमानास्पद आणि नवसंशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रेरक आहे. हे सातत्य कायम ठेवण्याबरोबरच अधिकाधिक दर्जेदार संशोधन करण्याकडेही हे संशोधक आपली वाटचाल राखतील, असा विश्वास विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी या सर्वांचे अभिनंदन करीत असताना व्यक्त केला. महत्त्वाचे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे २७६ संशोधक या क्रमवारीत आहेत. त्यामध्ये डॉ. गोसावी यांचाही समावेश आहे.

या क्रमवारीच्या अनुषंगाने अधिक माहितीसाठी जिज्ञासूंनी पुढील लिंकना भेट द्यावी.

https://www.adscientificindex.com/university/Shivaji+University/https://www.adscientificindex.com/h-index-rankings/?university=Shivaji+University

14 JAN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सायंटिफिक इंडेक्स'मध्ये विद्यापीठाचे १६८ संशोधक

## पी. एस. पाटील, डी. टी. शिर्के, ज्योती जाधव यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क



पी. एस. पाटील



ज्योती जाधव

**कोल्हापूर :** जागतिक पातळीवरील संशोधन कार्याचे मूल्यमापन करणाऱ्या ए.डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६ मध्ये येथील शिवाजी विद्यापीठाच्या १६८ संशोधकांचा समावेश झाला आहे. या यादीत माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अग्रस्थानी आहेत. यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचाही समावेश आहे.

प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी या सर्वांचे अभिनंदन केले आहे. डॉ. गोसावी यांचाही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या २७६ संशोधकांच्या क्रमवारीत समावेश आहे.

> सायंटिफिक इंडेक्स हा जगभरातील संशोधक व विद्यापीठांचे स्थानांकन करणारा आंतरराष्ट्रीय निर्देशांक आहे.

ए.डी. सायंटिफिक इंडेक्स हा जगभरातील संशोधक व विद्यापीठांचे स्थानांकन करणारा आंतरराष्ट्रीय निर्देशांक असून, संशोधकांच्या एच-निर्देशांक, आय-टेन निर्देशांक आणि शोधनिबंधांवरील उद्धरणे या निकषांवर आधारित ही क्रमवारी निश्चित करण्यात येते.

यामध्ये शिवाजी विद्यापीठातील विज्ञान, अभियांत्रिकी त्याचबरोबर तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या विविध शास्त्र शाखांतील संशोधकांचा समावेश आहे. या यादीत डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. विजया पुरी, डॉ. जॉन डिसूझा, डॉ. डी.एम. पोरे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. प्रमोद वासंबेकर यांचाही समावेश आहे.

### विद्यापीठातील आघाडीचे दहा संशोधक

डॉ. पी. एस. पाटील (भौतिकशास्त्र), डॉ. एस. पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव राजपुरे (सौरघट), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (ऊर्जा अभियांत्रिकी), डॉ. चंद्रकांत भोसले (भौतिकशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैववैद्यकीय अभियांत्रिकी), डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. संजय कोळेकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डी. डोंगळे (विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र).

> **शिवाजी विद्यापीठाचे संशोधक सातत्याने ए.डी. सायंटिफिक क्रमवारीत झळकत आहेत. या यादीमधील त्यांची संख्या वर्षागणिक वाढते आहे. विद्यापीठातील संशोधकांच्या यशाची ही वाढती कमान अभिमानास्पद आणि नवसंशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रेरक आहे.**
>
> **डॉ. सुरेश गोसावी**, प्रभारी कुलगुरू.

1 4 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सायंटिफिक इंडेक्स'मध्ये विद्यापीठाचे १६८ संशोधक

## विद्यापीठातील संशोधकांच्या कार्याचे जागतिक पातळीवर मूल्यमापन

तरुण भारत
अँकर

- प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचा समावेश
- माजी प्र-कुलगुरू प्रमोद पाटील अग्रस्थानी



प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक पातळीवरील संशोधन कार्याचे मूल्यमापन करणाऱ्या 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६"मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या १६८ संशोधकांचा समावेश झाला आहे. यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश असून डॉ. पाटील विद्यापीठातील संशोधकांत अग्रस्थानी आहेत.

ए. डी. सायंटिफिक इंडेक्स हा जगभरातील संशोधक व विद्यापीठांचे स्थानांकन करणारा आंतरराष्ट्रीय निर्देशांक आहे. संशोधकांच्या एच-निर्देशांक, आय-टेन निर्देशांक व शोधनिबंधांवरील निकषांवर आधारित क्रमवारी निश्चित करण्यात आली निर्देशांकात शिवाजी विद्यापीठातील विविध शास्त्र शाखांतील संशोधकांचा समावेश असून, विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या क्षेत्रांतील संशोधन अंतर्भूत झाले आहे. शिवाजी विद्यापीठाची जागतिक संशोधन ओळख अधिक भक्कम झाली असून, विद्यार्थी, संशोधकांसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य व संशोधन निधी मिळविण्यास उपयुक्त ठरणार आहे. डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. विजया पुरी, डॉ. जॉन डिसूझा, डॉ. डी.एम. पोरे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्यासह १६८ संशोधकांचा समावेश आहे.

### 'संशोधकांच्या यशाची वाढती कमान अभिमानास्पद"

शिवाजी विद्यापीठाचे संशोधक सातत्याने ए.डी. सायंटिफिक क्रमवारीत झळकत आहेत. विद्यापीठातील संशोधकांच्या यशाची ही वाढती कमान अभिमानास्पद आणि नवसंशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रेरक आहे. हे सातत्य कायम ठेवण्याबरोबरच अधिकाधिक दर्जेदार संशोधन करण्याकडेही हे संशोधक आपली वाटचाल राखतील, असा विश्वास विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केला.

### आघाडीचे दहा संशोधक असे:

डॉ. प्रमोद पाटील (भौतिकशास्त्र), डॉ. एस. पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव राजपुरे (सौरघट), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (ऊर्जा अभियांत्रिकी), डॉ. चंद्रकांत भोसले (भौतिकशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैववैद्यकीय अभियांत्रिकी), डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. संजय कोळेकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डी. डोंगळे (विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र).


1 4 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६' मध्ये ६८ संशोधक

**• माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अग्रस्थानी**



प्रमोद पाटील ज्योती जाधव एस. पी. गोविंदवार केशव राजपुरे अण्णासाहेब मोहोळकर



चंद्रकांत भोसले के. एम. गरडकर संजय कोळेकर तुकाराम डोंगळे अनिल घुले

**जनप्रवास : कोल्हापूर**

जागतिक पातळीवरील संशोधन कार्याचे मूल्यमापन करणाऱ्या ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १६८ संशोधकांचा समावेश झाला आहे. यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश असून डॉ. पाटील विद्यापीठातील संशोधकांत अग्रस्थानी आहेत.

ए. डी. सायंटिफिक इंडेक्स हा जगभरातील संशोधक व विद्यापीठांचे स्थानांकन करणारा आंतरराष्ट्रीय निर्देशांक असून, संशोधकांच्या एच-निर्देशांक, आय-टेन निर्देशांक आणि शोधनिबंधांवरील उद्धरणे या निकषांवर आधारित ही क्रमवारी निश्चित केली जाते. या निर्देशांकांमुळे संशोधनाचा दर्जा, सातत्य आणि जागतिक प्रभाव अधोरेखित होतो. या निर्देशांकात शिवाजी विद्यापीठातील विविध शास्त्र शाखांतील संशोधकांचा समावेश असून, विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या क्षेत्रातील संशोधन त्यात अंतर्भूत आहे.

विद्यापीठातील आघाडीचे दहा संशोधक (h-Indexआधारित) अनुक्रमे असे : डॉ. प्रमोद पाटील (भौतिकशास्त्र), डॉ. एस. पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), डॉ. केशव राजपुरे (सौरघट), डॉ. अण्णासाहेब मोहोळकर (ऊर्जा अभियांत्रिकी), डॉ. चंद्रकांत भोसले (भौतिकशास्त्र), डॉ. ज्योती जाधव (जैववैद्यकीय अभियांत्रिकी), डॉ. के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), डॉ. संजय कोळेकर (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डोंगळे (विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स), डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र). याखेरीज सदर यादीत पुढे डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. सागर डेळेकर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. विजया पुरी, डॉ. जॉन डिसूझा, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. एस. आर. सावंत, डॉ. गजानन राशीनकर, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्यासह १६८ संशोधकांचा समावेश आहे. या यशामुळे शिवाजी विद्यापीठाची जागतिक संशोधन ओळख अधिक भक्कम झाली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे संशोधक सातत्याने ए. डी. सायंटिफिक क्रमवारीत झळकत आहेत. शिवाय या यादीमधील त्यांची संख्या वर्षागणिक वाढते आहे. विद्यापीठातील संशोधकांच्या यशाची ही वाढती कमान अभिमानास्पद आणि नवसंशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रेरक आहे. हे सातत्य कायम ठेवण्याबरोबरच अधिकाधिक दर्जेदार संशोधन करण्याकडेही हे संशोधक आपली वाटचाल राखतील, असा विश्वास विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी या सर्वांचे अभिनंदन करीत असताना व्यक्त केला. महत्त्वाचे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे २७६ संशोधक या क्रमवारीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
14 JAN 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे १६८ संशोधक आंतरराष्ट्रीय 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचा समावेश; डॉ. पी. एस. पाटील अग्रस्थानी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १३ : जागतिक पातळीवरील संशोधन कार्याचे मूल्यमापन करणाऱ्या ए. डी. सायंटिफिक इंडेक्स-२०२६ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १६८ संशोधकांचा समावेश झाला आहे. यामध्ये प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा समावेश असून, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील विद्यापीठातील संशोधकांत अग्रस्थानी आहेत.

या निर्देशांकात विद्यापीठातील विविध शास्त्र शाखांतील संशोधकांचा समावेश असून, विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या क्षेत्रांतील संशोधन त्यात अंतर्भूत आहे. विद्यापीठातील आघाडीचे दहा संशोधक अनुक्रमे डॉ. पी. एस. पाटील (भौतिकशास्त्र), एस.



प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव



माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

पी. गोविंदवार (जैवरसायनशास्त्र), केशव राजपुरे (सौरघट), अण्णासाहेब मोहोळकर (ऊर्जा अभियांत्रिकी), चंद्रकांत भोसले (भौतिकशास्त्र), ज्योती जाधव (जैववैद्यकीय अभियांत्रिकी), के. एम. गरडकर (रसायनशास्त्र), संजय कोळेकर (रसायनशास्त्र), तुकाराम डोंगळे (विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स), अनिल घुले (रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे.

यासह संशोधकांच्या यादीत डॉ. नीलेश तरवाळ, राजेंद्र सोनकवडे, गोविंद कोळेकर, सागर डेळेकर, कैलास सोनवणे, सुशीलकुमार जाधव,

> शिवाजी विद्यापीठाचे संशोधक सातत्याने ए. डी. सायंटिफिक क्रमवारीत झळकत आहेत. शिवाय, या यादीमधील त्यांची संख्या वर्षागणिक वाढते आहे. विद्यापीठातील संशोधकांच्या यशाची ही वाढती कमान अभिमानास्पद आणि नवसंशोधक विद्यार्थ्यांसाठी प्रेरक आहे. हे सातत्य कायम ठेवण्याबरोबरच अधिकाधिक दर्जेदार संशोधन करण्याकडेही हे संशोधक आपली वाटचाल राखतील.
> **-डॉ. सुरेश गोसावी**, प्रभारी कुलगुरू

विजया पुरी, जॉन डिसूझा, डी. एम. पोरे, एस. आर. सावंत, गजानन राशीनकर, मानसिंग टाकळे, राजश्री साळुंखे, प्रमोद वासंबेकर आदींचा समावेश आहे. दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे २७६ संशोधक या क्रमवारीत आहेत. त्यामध्ये कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचा समावेश आहे.